Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):02
ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU
International open-access peer-reviewed refereed monthly journal
https://knowledgeableresearch.com/index.php/1

# मराठी साहित्य कृत्रिम बुद्धिमत्ता: उपयोग आणि मर्यादा

प्रा.डॉ.व्यंकटी पावडे*

मराठी विभागप्रमुख, केआरएम महिला वरिष्ठ महाविद्यालय, वजीराबाद नांदेड

**शोध सार**

*जग हे अफाट ज्ञानाने भरलेले आहे. 21व्या शतकात या विश्वामध्ये अनेक नवनवे शोध लागत आहेत. संशोधनाच्या क्षेत्रात दिवसेंदिवस बदल होत आहेत. असंख्य बदलांपैकी नव्या काळाने स्वीकारलेले ए आय 'कृत्रिम बुद्धिमत्ता' हे एक नवे तंत्रज्ञान आहे. या तंत्रज्ञानामुळे आपण आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करू शकतो. कला, साहित्य, संगीत, संशोधन, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, उद्योग, व्यापार,शेती, कारखाने, यंत्रे इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये AI अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून आपण कोणत्याही क्षेत्रात प्रगती करू शकतो म्हणून ए आय हे पुढील काळात सर्वांना अनिवार्य व प्रगतीचे माध्यम ठरणार आहे त्यामुळे या बदलाचा स्वीकार करून आपण कोणत्याही क्षेत्रात क्रांती करू शकतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही*

**बीज शब्द:** *कृत्रिम बुद्धिमत्ता, मराठी बोलीभाषा, नैसर्गिकता, नैतिकता, आव्हान*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
प्रा.डॉ.व्यंकटी पावडे
**Email:** vyankatipawde@gmail.com

## कृत्रिम बुद्धिमत्ता AI म्हणजे काय ?

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अनेक संकल्पना आहेत. मानवाप्रमाणे विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता यंत्रामध्ये किंवा संगणक प्रणालीमध्ये विकसित करणे म्हणजे 'कृत्रिम बुद्धिमत्ता' होय. एखादा संगणक जेव्हा माहितीचे संकलन करून विश्लेषण करतो आणि समस्या सोडवतो ही प्रक्रिया मानवविरहित होते,या होणाऱ्या प्रक्रियेस कृत्रिम बुद्धिमत्ता असे म्हणतात.शिकणे, तर्क लावणे, स्वयं दुरुस्ती, वेगवान कार्य, अचूक वेळ इत्यादी गोष्टी या तंत्रज्ञानाच्या जमेच्या बाजू आहेत. मानव आणि ए आय मध्ये मुख्य फरक म्हणजे सामान्य बुद्धिमत्ता म्हणून ओळख माणसाची आहे, तर AI मध्ये संकुचित बुद्धिमत्ता आहे. सामान्य बुद्धिमत्तेचा माणूस कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून अधिक वेगाने नवीन गोष्टी समजावून घेऊ शकतो व आपले कार्य अधिक गतिमान करू शकतो. म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करायला आपण शिकले पाहिजे. ती उद्याच्या भविष्य काळासाठी उपयुक्त अशी गोष्ट आहे.

शोधनिबंधाची व्याप्ती :

मराठी साहित्य हे सामाजिक बदल घडविणारे आणि नैतिक व मानवी मूल्यांची जपणूक करणारे साहित्य आहे. व्यक्ती, समाज आणि देश घडविण्यामध्ये साहित्याचा मोठा वाटा राहिला आहे. श्रीचक्रधर, संत नामदेव, ज्ञानदेव, बसवेश्वर या संतांनी गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, वि.दा.सावरकर,महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाज सुधारकांनी तसेच कवी केशवसुत, बा.सी. मर्ढेकर, कुसुमाग्रज, मंगेश पडगावकर, नारायण सुर्वे हे कवी, अण्णाभाऊ साठे, व्यंकटेश माडगूळकर,शंकर पाटील,रा. र. बोराडे, उद्धव शेळके, गंगाधर गाडगीळ हे कथाकार ते वर्तमान काळातील फ. मु. शिंदे, विश्वास पाटील, श्रीकांत देशमुख, जगदीश कदम, इंद्रजीत भालेराव या पिढीपर्यंत मराठी साहित्य अभ्यासले असता या साहित्याने समाजाला नवी दिशा दिली आहे. या प्रबोधनात्मक साहित्याची ओळख जगास व्हावी व मराठी साहित्य व त्यातील मुल्यविचार सर्वांना कळावा साहित्य लेखन, वाचन, चिंतन यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून मराठी साहित्यप्रेमी व्यक्तींनी कृत्रिम

बुद्धिमत्ता या नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेऊन कार्य केले तर ते अधिक प्रभावी ठरू शकते. या तंत्रज्ञानामुळे ज्ञानवृद्धीमध्ये वाढ होते. अनेक माहितीच्या संधी उपलब्ध होतात व साहित्याचा अभ्यास करण्यासाठी सोपे होते परंतु या तंत्रज्ञानाचा जसा चांगला उपयोग आहे तशाच काही मर्यादा देखील जाणवतात.

**गृहीतके :**

1) कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी साहित्य यांचा सहसंबंध समजून घेणे.

2) कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण होणाऱ्या संधी,धोके आणि आव्हाने यांचा अभ्यास करणे.

3) मराठी साहित्य,संशोधन,प्रकल्प लेखन, ऑडिओ बुक, ई लायब्ररी, ई ग्रंथालय इत्यादी साहित्य उपक्रमामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कसा करता येईल याचा शोध घेणे. 4)मराठी साहित्य चळवळ, वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल याचा शोध घेणे.

5) कृत्रिम बुद्धिमत्तेचा समाज मनावर सकारात्मक व नकारात्मक कसा परिणाम होतो याचा अभ्यास करणे.

अशी काही गृहीतके लक्ष्यात घेऊन हा शोधनिबंध लिहिण्याचा मानस आहे.

**संशोधन पद्धती:**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी साहित्य यांचा संबंध लक्षात घेताना तौलनिक,वर्णनात्मक,सर्वेक्षण,ऐतिहासिक,

उपयोजित इत्यादी संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**मराठी साहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता :**

महाराष्ट्र हे राज्य मराठी भाषिक लोकांचे राज्य म्हणून ओळखले जाणारे राज्य आहे. मराठी भाषेला एक वैभवशाली इतिहास आहे. कोट्यावधी लोकांचा जीवन व्यवहार या भाषेवर चालतो. या भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला. या भाषेस हजारो वर्षाचा इतिहास असून लीळा, वचने, ओवी, अभंग, लावणी, पोवाडे,लोकसहित्य इत्यादी प्राचीन साहित्याची परंपरा आहे. या भाषेमध्ये कथा कविता कादंबरी चरित्र आत्मचरित्र नाटक प्रवास वर्णन ललित इत्यादी वाङ्मय प्रकारामध्ये लेखन केले जाते. हे साहित्य समजून घेण्यासाठी पूर्वी अनेक सुसज्ज ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय उपलब्ध होती. लाखो लोक आनंदाने मराठी साहित्य वाचत असत, पण काळ बदलला यंत्र तंत्रामुळे संगणीकरण आले व डिजिटल युगास प्रारंभ झाला त्यामुळे एकेकाळी सुसज्ज असणाऱ्या ग्रंथालयाची जागा आज संगणकाने घेतली आहे.

या संगणक व डिजिटल क्रांतीने एका नव्या तंत्रयुगाची सुरुवात झाली आहे. मानवाने गतिमान जीवन पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे कमी वेळेत व श्रमात त्यास माहिती हवी आहे. त्यामुळे जगभरातील असंख्य लोक ऑनलाइन व्यवहाराकडे वळले आहेत. व्यवहार, व्यापार, उद्योग, व्यवसाय,वाचन,अभिव्यक्ती,लेखन ऑनलाईन झाले आहे.अशा काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर साहित्याच्या क्षेत्रातही होत आहे. अनेक लेखक, कवी, नाटककार,कादंबरीकार,अभिनेते, कलावंत हे या बुद्धिमत्तेचा वापर करत आहेत त्यामुळे साहित्याची आवड असणाऱ्या रसीक वृत्तीच्या माणसांना या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे साहित्याची गोडी लागली आहे.परंतु या तंत्रज्ञानाचा जसा सकारात्मक उपयोग आहे तसेच काही नकारात्मक देखील परिणाम आहेत.

**मराठी साहित्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग :**

**1) नवलेखकांना साहित्यनिर्मिती करण्यास सहाय्य:**

या तंत्रज्ञानाचा वापर करून नवलेखकांना कथा, कविता, कादंबरी,नाटक अथवा इत्यादी साहित्य प्रकारात लेखन करण्यासाठी प्रेरणा मिळते. लेखनप्रक्रिया कशी आहे हे समजून घेऊन लेखन करता येते. परंतु हे लेखन करताना साहित्य चौर्य होऊ शकते.

**2) साहित्याची विश्लेषण करणे सोपे :**

AI या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे इतर अनेक भाषेतील साहित्य समजून घेता येते त्याचे विश्लेषण करण्यास सोपे जाते. मराठी साहित्य इतर भाषेत नेता येईल. कवितेचा आशय,नाटकातील प्रभावी डायलॉग,अवघड शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांचा शोध घेता येतो.

**3) भाषांतर करण्यास उपयुक्त:**

AI कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मराठी साहित्याचा इतर भाषेत अनुवाद करता येतो. मराठी साहित्य हे परप्रांतीय अथवा परदेशीय लोकांना समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरते. मराठीतील ज्ञान हे इतर भाषिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे हे प्रभावी माध्यम असून यामुळे मराठी भाषा साहित्य यांचा प्रचार, प्रसार आणि विस्तार होण्यास मदत होते.

**4) प्रकल्प लेखन आणि संशोधन करण्यास प्रेरक :**

प्रकल्प लेखन अथवा मराठी संशोधन करण्यासाठी म्हणावे त्याप्रमाणात आज डिजिटल संसाधनाचा विकास झालेला दिसून येत नाही. मराठी मासिके, साप्ताहिके, संशोधन संसाधने हे डिजिटल झालेली दिसत नाहीत त्यामुळे एखाद्या निवडक विषयावर प्रकल्प लेखन अथवा संशोधन करण्यासाठी अडथळा निर्माण होतो. परंतु कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे हे संशोधन कार्य आता अधिक गतिमान झाले आहे. AI च्या वापरामुळे माहिती संकलन, वर्गीकरण, भाषांतर, डेटा व्यवस्थापन, विश्लेषण, दस्तऐवज मिळवणे सोपे झाले आहे म्हणून हे एक माहितीचे स्त्रोत बनले आहे.

**5) वेगवान माहितीचे संकलन आणि वेळ व श्रमाची बचत:**

लेखन,संशोधन आणि साहित्याची प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट असून एखादा संदर्भ मिळविण्यासाठी पूर्वीच्या काळी खूप कसरत करावी लागत असे. ग्रंथालयात जाऊन अनेक ग्रंथाचे संदर्भ लक्षात घ्यावे लागत होते. आज कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे तात्काळ व अधिक वेगाने माहितीचे संकलन होते. त्यामुळे दुर्मिळ ग्रंथ व एखाद्या माहितीचे संकलन कमी वेळात व श्रमात होते. साहित्य समीक्षा, मराठी भाषा प्रक्रिया समजून घेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करता येतो ज्यामुळे मराठी भाषेचा विस्तार आणि विकास होण्यास मदत होते.

अशाप्रकारे कृत्रिम बुद्धिमत्तेचा मराठी साहित्यामध्ये उपयोग होताना दिसून येतो.

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मर्यादा:**

मराठी साहित्याचा विकास करण्यासाठी जरी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर होत असला तरी एआय च्या काही मर्यादाही जाणवतात. हे माहितीचे संकलन करताना मिळालेल्या माहितीबद्दल शाश्वती देणे कठीण आहे, त्याच्या विश्वसनीयतेबद्दल शंका निर्माण होते. हे एक माहितीचे स्त्रोत आहे. इतरांनी नोंदवलेला मजकूर अथवा संदर्भ एकत्र करून देण्याचे कार्य कृत्रिम बुद्धिमत्ता करते त्यामुळे या तंत्रज्ञानाच्या काही मर्यादा जाणवतात त्यापुढील प्रमाणे सांगता येतील.

1) कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतःचे सर्जनशील साहित्य निर्माण करू शकत नाही.भावना, संवेदना, कल्पना, विचार यांचा अभाव तेथे आहे कारण ती एक कृत्रिम बाब आहे.

2) मानवी मेंदूमध्ये अनेक संवेदना व विचारांचे जाळे विणलेले असते त्यामुळे कोणत्याही लेखकाने अथवा कवीने लिहिलेले साहित्य हे एक नवनिर्मिती असते परंतु एआय तंत्रज्ञानाचा आधार घेऊन लिहिलेले साहित्य हे कृत्रिम वाटते त्यामध्ये भावनेचा ओलावा अधिक गडदपणे उमटत नाही त्यामुळे ते नवसर्जन नसते.

3) AI मॉडेल्स ही स्वायत्त नसतात ते मानवाच्या नियंत्रणाखाली असतात.

4) AI या तंत्रज्ञानाच्या माहिती संकलनास काही मर्यादा येतात. अनिश्चित परिस्थितीमध्ये निर्णय घेण्यास ते अक्षम ठरतात तसेच काही वेळेस भाषेचीही मर्यादा येते.

5) एखाद्या लेखकाच्या नावे बनावट मजकूर व फेक ग्रंथाची निर्मिती होऊ शकते. तसेच काही ठराविक वाक्य तयार करून प्रसिद्धी मिळवता येते अथवा वाद निर्माण करता येतो त्यामुळे सायबर क्राईमची शक्यता अधिक आहे.

6) मराठी भाषा ही असंख्य बोली भाषेने समृद्ध झालेली भाषा आहे. AI या तंत्रज्ञानास बोली भाषेच्या मर्यादा येतात. त्यामुळे बोलीभाषेतील शब्दांचा अर्थ AI ला सांगणे कठीण होते.

7) मानव हा अंतिम रचनाकार असून AI हे प्राथमिक मसुदा विश्लेषण व एक शोधन आहे.

अशाप्रकारे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काही मर्यादा जाणवतात पण या मर्यादाकडे दुर्लक्ष करून आपण मराठी साहित्याचा विकास व विस्तार करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर निश्चितपणे करू शकतो हे नाकारता येत नाही.

**निष्कर्ष:**

मराठी साहित्याच्या विस्तारासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा सुयोग्य वापर करता येतो. नव्या डिजिटल युगातील हे एक क्रांतिकारक साधन आहे. साहित्य व इतर कलांच्या विकासासाठी त्याचा सदुपयोग होतो. AI आणि मानवी सर्जनशीलतेचा समन्वय साधल्यास व्यापक वाचक वर्ग निर्माण होईल व मराठी भाषा साहित्य कला संस्कृतीस निश्चित चांगले दिवस येतील. कमीत कमी वेळेत श्रमात अधिक वेगवान माहिती मिळवता येते. नवलेखकांसाठी प्रेरणादायी बाब आहे. मराठी साहित्य संशोधनासाठी त्याचा योग्य वापर करता येतो. भविष्यामध्ये AI हे लेखकाचे सहाय्यक व संग्रहक म्हणून कार्य करेल. खरी साहित्याची निर्मिती ही मानवी मेंदूतूनच निर्माण होते AI हे एक कृत्रिम उपकरण असल्यामुळे मानवी भावभावना, संवेदना व विचारापासून ते दूर आहे. माहितीचे दळणवळण करण्याचे ते एक माध्यम असून त्यामुळे वांग्मयचौर्याची भीती नाकारता येत नाही. भविष्यकाळात या उपकरणाचा अधिक वापर झाल्यास मानवी मेंदूवर

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)

मर्यादा येऊन तो संकुचित बनण्याची भीती आहे. त्यामुळे मनुष्य हा परावलंबी होऊ शकतो त्याचे नवसर्जन खुंटू शकते ही भीती वाटते. या काही मर्यादा जाणवल्या तरी संपूर्ण जगभरातील बदल लक्षात घेत असताना या कृत्रिम बुद्धिमत्तेचे अस्तित्व आपणास नाकारता येणार नाही कारण भविष्यकाळात आपण त्याशिवाय प्रगती करू शकणार नाही म्हणून मराठी भाषा साहित्याच्या विकासासाठी या बुद्धिमत्तेचा योग्य वापर करता येऊ शकतो.

**संदर्भ:**


1) माधवी देशपांडे, माहिती तंत्रज्ञान आणि मराठी भाषा, सुबोध प्रकाशन,पुणे

2) डॉ.अनिल जोशी, कृत्रिम बुद्धिमत्ता: संकल्पना आणि उपयोग, महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे

3) प्रा.म.ग. देशमुख, मराठी संगणक प्रक्रिया: भाषा आणि साधने विद्या प्रकाशन, नागपूर

4) प्रा. अशोक कुलकर्णी, मराठी भाषा आणि संगणक, सत्यम प्रकाशन, मुंबई